Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

३८ /२०२६

**विषय :** "हर घर तिरंगा – २०२६" अभियानांतर्गत राष्ट्रध्वज फडकविणेबाबत.

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स. प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी/विद्यार्थीनी तसेच विद्यापीठ परिसरात राहणारे रहिवासी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रानुसार भारत सरकारच्या **"हर घर तिरंगा – २०२६"** अभियानामध्ये सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

त्याअनुषंगाने पुढील सूचनांचे पालन करावे :

१) **अभियानाचा कालावधी :** दिनांक ०९ ऑगस्ट २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत कोणत्याही दिवशी आपल्या निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकवावा. तथापि, राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा, सन्मान व पावित्र्य अबाधित राहील याची काळजी घ्यावी.

२) **दिवस व रात्र राष्ट्रध्वज फडकविणे :** केंद्र शासनाने जुलै, २०२२ मध्ये भारतीय ध्वज संहितेत नमूद केल्याप्रमाणे नागरिकांना खुल्या जागेत किंवा घरावर दिवस तसेच रात्री अशा दोन्ही वेळेस राष्ट्रध्वज फडकविता येतो.

३) **राष्ट्रध्वज फडकविण्याच्या वेळेबाबत :** या अभियानाच्या कालावधीत राष्ट्रध्वज फडकविण्यासाठी विशिष्ट दिवस अथवा वेळेचे बंधन नाही. त्यांच्या सोयीनुसार अभियान कालावधीत कोणत्याही दिवशी व कोणत्याही वेळी राष्ट्रध्वज फडकविता येईल. मात्र, राष्ट्रध्वज फडकविताना त्याचा योग्य सन्मान राखणे तसेच भारतीय ध्वज सहितेतील सर्व नियम व तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे.

सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व सेवक यांनी सदर अभियानात उत्स्फूर्त सहभागी व्हावे.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जा. क्र. आस्थापना / 1092
दि. 12 AUG 2026

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र.-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, सर्व संचालक यांचे कार्यालय

२) सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक

३) संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

४) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**अधिविभाग/प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, यांचे निदर्शनास आणावे.**